


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०८३ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




# मुंबईच्या महापौरपदी भाजपच्या रितू तावडे

## उपमहापौरपदी शिंदे गटाचे संजय घाडी; मुख्यमंत्री फडणवीस, शिंदेंच्या उपस्थितीत औपचारिक निवड



मुंबई: (समर्थ गांवकरी)

देशातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेवर अखेर भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) महायुतीने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. भारतीय जनता पक्षाच्या रितू तावडे यांची मुंबईच्या महापौरपदी, तर शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षाचे संजय घाडी यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड झाली आहे. या निवडीमुळे भाजपने तब्बल 44 वर्षांनंतर महापौरपद आपल्याकडे खेचून आणले आहे. मुंबई महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदासाठी 7 फेब्रुवारी 2026 रोजी अर्ज भरण्याची प्रक्रिया पार पडली. भाजपकडून रितू तावडे आणि शिंदे गटाकडून संजय घाडी यांनीच केवळ आपले अर्ज दाखल केले होते. विरोधी पक्षांनी आपला उमेदवार उभा न केल्याने ही प्रक्रिया बिनविरोध पार पडली. यानंतर 11 फेब्रुवारी रोजी अधिकृतपणे या नावांची घोषणा करण्यात आली.

रितू तावडे या भाजपच्या मुंबईतील एक आक्रमक आणि अनुभवी नेत्या म्हणून ओळखल्या जातात. वर्ष 2012मध्ये घाटकोपर प्रभाग क्रमांक 121 मधून त्यांनी पहिल्यांदा निवडणूक लढवली होती आणि त्या निवडूनही आल्या होत्या. यानंतर वर्ष 2017मध्ये प्रभाग क्रमांक 127 मधून त्यांनी विजय मिळवला होता. वर्ष 2026च्या निवडणुकीमध्ये रितू तावडे यांनी प्रभाग क्रमांक 132 मधून विजय मिळवलाय. यापूर्वी त्यांनी मुंबई महापालिकेच्या शिक्षण समितीचे अध्यक्षपदही भूषवले आहे.

53 वर्षीय रितू तावडे यांनी निवडणुकीसाठी दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये नमूद केलंय की, त्यांचे शिक्षण 12वी पर्यंत झाले आहे. वर्ष 1993 साली आचार्य मराठे कॉलेजमधून त्यांनी इयत्ता बारावीचे शिक्षण पूर्ण केले आहे. विद्याविहारच्या रहिवासी असलेल्या रितू तावडे या व्यापार क्षेत्रामध्ये कार्यरत असल्याचे प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.

> रितू तावडे यांच्या कौटुंबिक आर्थिक स्थितीबद्दलही प्रतिज्ञापत्रात माहिती देण्यात आलीय. रितू तावडे कुटुंबाकडे एकूण 5 कोटी 26 लाख 67 हजार 417 रुपयांची मालमत्ता आहे. यामध्ये 2 कोटी 82 लाख 42 हजार 417 रुपयांची जंगम मालमत्ता आणि 2 कोटी 44 लाख 25 हजार रुपयांच्या स्थावर मालमत्तेचा समावेश आहे. तावडे कुटुंबावर सार्वजनिक आणि शासकीय वित्तीय संस्थांचे मिळून एकूण 3 कोटी 2 लाख 11 हजार 958 रुपयांचे कर्ज आहे, असे शपथपत्रात नमूद करण्यात आलंय. त्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न साधारण 14 लाख 71 हजार 870 रुपये इतके आहे.

## थोडक्यात...

### अजित पवारांच्या निधनादिवशीच मंत्रालयात गैरप्रकार?

मुंबई (समर्थ गांवकरी) : राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाचा संपूर्ण राज्याला धक्का बसला. या निधनानंतर राज्य सरकारनं तातडीनं दुखवटा जाहीर केला होता. त्यावेळी शासकीय सुट्टी जाहीर झालेली असताना, अल्पसंख्याक विकास विभागात मात्र एक वेगळाच प्रकार सुरु होता. अत्यंत गंभीर बाब म्हणजे, दुखवटा आणि सुट्टीच्या दिवशी तसेच कार्यालयीन वेळ संपल्यानंतरही रात्री उशिरापर्यंत या विभागात डिजिटल प्रमाणपत्रांचा जणू पाऊस पडला, असा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणात नियमांची पायमल्ली करत मोठ्या प्रमाणावर बोगस प्रमाणपत्रे जारी करण्यात आल्याचा खळबळजनक प्रकार आता समोर आला आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ. साहिल वर्हाळे यांनी या संदर्भात उपमुख्यमंत्री आणि अल्पसंख्याक विकास विभागाकडे पुराव्यासह तक्रार दाखल केली असून यामुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

### बदलापूरमध्ये चाललंय काय?

मुंबई (समर्थ गांवकरी) : ठाणे जिल्ह्यातील बदलापूरमध्ये घडलेले बाललैंगिक अत्याचार प्रकरण संपूर्ण राज्यात गाजले होते, या घटनेने सर्वच स्तरातून संतापाची लाट उसळली होती. मात्र, या घटनेनंतरही येथील मुली व महिला सुरक्षित नसल्याचे दिसत आहे. आता आणखी एका घटनेने बदलापूरचे नाव पुन्हा चर्चेत आले आहे. ट्यूशनला जाणाऱ्या एका अल्पवयीन चिमुकलीचा एका रिक्षा चालकाने हात पकडून विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. या प्रकरणी पोलिसांनी पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करत आरोपीला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, 10 वर्षांची चिमुकली आपल्या मैत्रिणीसह ट्यूशनला जात असताना एका रिक्षा चालकाने या मुलीचा हात पकडला. विरोध करूनही रिक्षा चालक हात सोडत नव्हता. अखेर प्रसंगावधान राखत तिच्या मैत्रिणीने रक्षा चालकाच्या डोळ्यात माती फेकली आणि तिथून पळ काढला.

# महात्मा फुलेंच्या विचारांची अनेकांना भीती : रुपाली चाकणकर

पुणे : (समर्थ गांवकरी)



तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यातील तेल्लापूर गावात महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे महाराष्ट्रातून संताप व्यक्त केला जात आहे. आता यावर राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या रूपाली चाकणकर यांनी ट्विट करत आपली प्रतिक्रिया दिली आहे. महात्मा फुलेंच्या विचारांची आजही काही प्रवृत्तींना भीती वाटते म्हणून पुतळे तोडले जात असल्याची टीका चाकणकर यांनी केली आहे. रूपाली चाकणकर यांनी ट्विट करत म्हटले की, तेलंगणा मधील तेल्लापूर (जि. संगारेड्डी) येथे महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्याची केलेली तोडफोड ही कोणतीही क्षणिक घटना नाही, तर सामाजिक समतेच्या चळवळीवरचा जाणीवपूर्वक केलेला हल्ला आहे. ज्या महापुरुषांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली, सर्वांना शिक्षणाचा अधिकार दिला, जात-अंधश्रद्धा आणि अन्यायाविरुद्ध शास्त्रशुद्ध संघर्ष केला, त्या महात्मा फुले यांच्या विचारांची भीती आजही काही प्रवृत्तींना वाटते म्हणूनच पुतळे तोडले जातात. तसेच पुढे रुपाली चाकणकर म्हणाल्या, पुतळा तोडणे म्हणजे इतिहास पुसता येतो, अशी गैरसमजूत ज्यांना आहे त्यांनी लक्षात ठेवावे, महात्मा फुले हे दगडात नाही, तर विचारांमध्ये, पुस्तकांमध्ये, शिक्षणात आणि लाखो वंचितांच्या स्वाभिमानात जिवंत आहेत. ही घटना म्हणजे संविधानविरोधी मानसिकतेचे दर्शन, सामाजिक तेढ निर्माण करण्याचा कट, पुरोगामी विचारांवर घाला आहे. या प्रकरणात दोषींवर केवळ अटक नव्हे तर कडक शिक्षा झाली पाहिजे. तोडफोड करणाऱ्यांची वैचारिक पार्श्वभूमी उघड झाली पाहिजे. तेलंगणा शासनाने फुले यांच्या अधिक भव्य व सन्मानपूर्वक पुतळ्याची उभारणी करावी, अशी मागणी रुपाली चाकणकर यांनी केली आहे. तसेच ज्या विचारांनी हजारो वर्षांचा अन्याय मोडीत काढला, ते विचार पुतळे तोडून संपत नाहीत. आज फुले यांचा पुतळा तोडला गेला आहे, पण उद्या प्रत्येक चौकात फुले विचार उभे राहतील, असेही चाकणकर म्हणाल्या.

# चंद्रपूरचा निर्णय फडणवीस-बावनकुळेंच्या अनुमतीनेच

चंद्रपूर : (समर्थ गांवकरी)



उबाठा आणि भाजप युतीबाबत मी स्वत: कोठेकर यांच्याशी दिवसातून चारदा चर्चा करायचो आणि बावनकुळे यांच्याशी चर्चा करायचो आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अनुमती घेतली जेव्हा उबाठाला एक वर्ष देण्याची चर्चा सुरू असताना मुख्यमंत्र्यांना या संदर्भातील माहिती दिली. तेव्हा मुख्यमंत्री म्हणाले एक वर्ष नाही गरज असेल तर सव्वावर्ष द्या. महापौर हा भाजपचा झाला पाहिजे, पहिले महापौर आमच्याकडे असावा, असे भाजपचे नेते सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, चंद्रपूर भाजपमध्ये दोन गट आहे हे सर्वांना माहिती आहे त्यामुळे काही कार्यकर्ते चाणाक्य, किंगमेंकर अशी बॅनरबाजी करतात. कार्यकर्त्यांना गटनेता आपल्या गटाचा झाला नाही याचे वाईट वाटले होते पण महापौर आपला झाल्याने त्यांना आनंद झाला. कुणी क्रेडिट घेऊन काय फायदा करार कुणासोबत झाला आहे? असा टोला आमदार जोरगेवार यांना लगावला आहे.

# अजित पवारांचा पायलटच नव्हे, तर विमानही बदलले



मुंबई : (समर्थ गांवकरी)

- हवाई सुंदरी पिंकी माळीच्या वडिलांचा दावा
- पायलट ट्रॅफिकमध्ये अडकल्याचा दावाही खोडला

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा पायलटच नव्हे तर विमानही ऐनवेळी बदलण्यात आले होते, असा आरोप या दुर्घटनेत ठार झालेल्या फ्लाईट अटेंडन्ट पिंकी माळी यांच्या वडिलांनी केला आहे. त्यांनी बारामतील येथील विमान दुर्घटना अपघात नव्हे तर घातपातच असल्याचा दावा केला आहे. अजित पवारांच्या मृत्यूविषयी ना-ना प्रकारचे तर्कवितर्क व्यक्त केले जात असताना पिंकी माळीच्या वडिलांनी हा आरोप केल्यामुळे राज्यात एकच खळबळ माजली आहे.

अजित पवार यांच्या विमानाचा गत 28 जानेवारी रोजी बारामती विमानतळावर अपघात झाला होता. त्यात अजित पवार व पिंकी माळी यांच्यासह 5 जणांचा मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर पिंकी माळी यांचे वडील शिवकुमार माळी यांनी हा अपघात नव्हे तर घातपात असल्याचा संशय व्यक्त केला आहे. ते एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले, अपघाताच्या दिवशी फक्त वैमानिक नव्हे तर विमानही बदलण्यात आले होते.

# राष्ट्रवादी भविष्यातही NDA सोबतच राहणार

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)



- सुनेत्रा पवार मोदी-शहांना भेटल्यानंतर सुनील तटकरेंची स्पष्टोक्ती; विलीनीकरण लोंबकळणार

सत्ताधारी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आपला पक्ष भविष्यातही केंद्रातील सत्ताधारी NDA सोबतच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतल्यानंतर तटकरेंनी ही भूमिका विषद केली आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या कथित विलीनीकरणाचा मुद्दा तूर्त लोंबकळल्याचा दावा केला जात आहे.

अजित पवार यांचे गत 28 जानेवारी रोजी एका विमान अपघातात निधन झाले. तेव्हापासून राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या दोन्ही गटांमध्ये जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. शरद पवार गटाकडून आपली अजित पवारांशी विलीनीकरणाच्या मुद्यावर चर्चा सुरू होती असा दावा केला आहे. पण अजित पवार गटाच्या प्रफुल्ल पटेल व सुनील तटकरेंसारख्या नेत्यांनी हा दावा जोरकसपणे फेटाळून लावला आहे. अजित पवारांनी अशी एखादी चर्चा सुरू असती तर आम्हाला जरूर सांगितली असती, असा त्यांचा युक्तिवाद आहे. या पार्श्वभूमीवर सुनील तटकरे यांनी आज सुनेत्रा पवार यांच्यासोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली.

या भेटीनंतर सुनील तटकरे पत्रकारांशी बोलताना उपरोक्त भूमिका विषद केली. ते म्हणाले, विलीनीकरणाच्या मुद्यावर आमच्या पक्षाच्या भूमिकेचा प्रश्नच येत नाही. कारण, आम्ही वारंवार विचारत आहोत की, विलीनीकरण कोणत्या पक्षात करायचे? दुसरी गोष्ट म्हणजे आम्ही सध्या एनडीएमध्ये आहोत. दादा असतानाच मी आमची भूमिका स्पष्ट केली होती. दादांच्या नेतृत्वात आम्ही एनडीएसोबत जाण्याचा निर्णय घेतला होता. आमची तीच भूमिका आजही कायम आहे. आम्ही भविष्यातही एनडीएसोबतच राहू.

ते पुढे म्हणाले, एनडीएमध्ये येण्यासंबंधीची स्पष्टता कुणीतरी करणे आवश्यक आहे. आता विलीनीकरण किंवा काय होईल हा मुद्दा वेगळा आहे. सुनेत्रा पवारांनी उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सांभाळली आहे.

आता त्याच विधीमंडळ पक्षाच्या नेत्या असाव्यात अशी आमची भूमिका होती. त्यानुसार त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राष्ट्रवादीच्या सर्व बैठकांत अजित पवार आपण एनडीएसोबत जायला हवे अशी भूमिका मांडत होते. 2019 साली 3 पेक्षा दोन पक्षांनी एकत्र आल्यास राज्याचा चांगला विकास होईल असा त्यांचा विचार होता, असेही सुनील तटकरे यावेळी बोलताना म्हणाले.

# आता NA परवानगीची गरज नाही : बांधकाम नकाशा हाच NA

## जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची गरज नाही, कायद्यात महत्वाची सुधारणा

मुंबई : (समर्थ गांवकरी)



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने राज्याच्या जमीन महसूल कायद्यात मोठा बदल केला आहे. त्यानुसार, आता शेतकऱ्यांना बिगर कृषी (एनए) वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घेण्याची कोणतीही गरज नाही.आता बांधकाम आराखडा मंजुरीलाच एनए मानले जाणार आहे. सरकाच्या या निर्णयाचा राज्यातील हजारो शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार जमीन महसूल कायद्यात बदल केला आहे. या बदलानुसार, आता अकृषक कर आकारला जाण्याची सुविधा पूर्णतः रद्द करण्यात आली आहे. जमीन मालकांना फक्त एकरकमी 'रुपांतरण अधिमूल्य' भरावे लागेल. या रकमेच्या भरपाईनंतर जमीन अकृषक वापरासाठी रुपांतरित करता येणार आहे. याशिवाय शेतकऱ्यांना सनद घेण्याची गरजही संपुष्टात आली आहे. बांधकाम आराखडा मंजुरीलाच एनए परवानगी मानली जाईल. यामुळे जमीन रुपांतर प्रक्रिया अधिक जलद, सोपी व पारदर्शक होईल.

उल्लेखनीय बाब म्हणजे आतापर्यंत अकृषक वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घेणे आवश्यक होते. यासाठी विविध दस्तऐवज गोळा करताना शेतकऱ्यांच्या नाकीनऊ येत होते. पण महसूल विभागाने तयार केलेल्या नवीन कार्यपद्धतीनुसार शेतकऱ्यांचे काम अधिक सुलभ व सोपे होणार आहे. ही कार्यपद्धती राजपत्रातही प्रकाशित करण्यात आली आहे. शासनाच्या या निर्णयामुळे जमीन रुपांतर प्रक्रियेत सुलभता येईल. याशिवाय अकृषक कराचाही त्रास संपेल. महसूल विभागाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता येईल. जमीन मालकांच्या वेळेची बचत होऊन त्यांचा प्रशासनाकडे हेलपाटे मारण्याचा त्रास कमी होईल. विशेषतः यापुडे त्यांना जमिनीचा एनए मिळवण्यासाठी अनेक महिने किंवा वर्षांची प्रतिक्षा करावी लागणार नाही. केवळ रुपांतरण अधिमूल्य भरून ते आपली जमीन अकृषक वापरासाटी रुपांतरित करता येणार आहे.

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे या निर्णयाची माहिती देताना आपल्या पोस्टमध्ये म्हणाले, महसूल विभागाचे लोककल्याणासाठी महत्त्वाचे पाऊल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेने महसूल कायद्यात ऐतिहासिक सुधारणा. राजपत्र लागू !!

* 'एन. ए.' परवानगी अन् वार्षिक कर इतिहासजमा
* बांधकाम नकाशा हीच एन. ए. परवानगी
* जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची गरज संपली

राज्यात कृषी क्षेत्र अकृषक करताना एन. ए. परवानगीची अट रद्द करण्यात आली असून, एन. ए. करताना आता नगर रचना विभाग आणि स्थानिक प्राधिकरणाने दिलेली बांधकाम नकाशा परवानगी हीच आता एन. ए. परवानगी असणार आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून स्वतंत्र बांधकाम परवानगी घेण्याची आवश्यकता असणार नाही.

## पिंपळगाव निपाणी पंचक्रोशीतील हरिभक्त पारायण कारभारी दगडू गोरडे यांच्या रूपाने

# एक अनमोल हिरा हरपला

(समर्थ गांवकरी)

पिंपळगाव निपाणी व पंचक्रोशी मध्ये कुठेही सप्ताह, भजन, कीर्तन असले की त्यात हमखास आढळणारे व्यक्तिमत्व म्हणजे कारभारी दगडू गोरडे. आपल्या हार्मोनियम वादनाच्या कलेमुळे तसेच विविध अभंग वेगवेगळ्या चालींवर गाण्याच्या कलेमुळे त्यांनी गेल्या 40 वर्ष पंचक्रोशीवर निर्विवाद वर्चस्व गाजवले. दुर्गा, कलावती, बागेश्वरी, मालकंस सारंग अशा अनेक स्वर रागांवर त्यांची पकड होती. प्रत्येक कीर्तन आणि भजनामध्ये त्यांचा सहभाग असायचा. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये अनेक तरुण भजनी घडवले. अनेक तरुणांना हार्मोनियम/ पेटी वादन शिकवले. अतिशय गरीब परिस्थितीत पिंपळगाव निपाणी येथे दिनांक 28/03/1945 रोजी कारभारी दगडू गोरडे यांचा जन्म झाला. त्या काळच्या इयत्ता ८ वी पर्यंत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. १९६८ मध्ये चास या गावी शिक्षक म्हणूनही त्यांनी नोकरी केली. घरातील



एकुलता एक मुलगा असल्याने त्यांना आई-वडिलांनी शिक्षकी नोकरी सोडायला लावली. नोकरी सोडल्यानंतर त्यांनी गावात किराणा दुकान टाकले. मुळातच दानशूर स्वभाव, लोकांच्या अडीअडचणीत मदत करण्याचा स्वभाव, प्रेमळ वागणे यामुळे किराणा दुकानाच्या उधारीत वाढ झाल्याने त्यांनी लवकरच आपला किराणा व्यवसाय बंद केला. परंतु किराणा व्यवसाय करत असतानाच हार्मोनियम वादनाची आवड त्यांना जडली. आपला व्यवसाय करताना त्यांनी वेगवेगळे अभंग म्हणत प्रॅक्टिस सुरू ठेवली. भरपूर सराव केला. नंतर गावोगावच्या भजनी मंडळांमध्ये ते पेटी वादन व गायनासाठी जाऊ लागले. लवकरच त्यांना पंचक्रोशीत व तालुक्यात मोठी प्रसिद्धी मिळाली. 1980 साली पोटाच्या अल्सर च्या विकाराने त्यांना ग्रासले. या आजारातून ते बरे होतील की नाही अशी कुटुंबाला धास्ती होती पण ईश्वरी कृपेमुळे पुणे येथे उपचार घेऊन अल्सर च्या जीवघेणे आजारातून ते बचावले. त्यानंतर पथ्य सांभाळत त्यांनी आपला दिनक्रम पूर्ववत सुरू केला प्रत्येक साप्ताह मध्ये ते हजेरी लावायचे. बिडी उद्योग सांभाळून शेती सांभाळून त्यांनी आपली ईश्वर सेवा सुरू ठेवली. नेहमी मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी पहिली ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना एक ते तीन नंबर पर्यंत नेहमी बक्षीस देत असत. दरम्यानच्या काळात त्यांची सर्वात लहान बहीण कुसुम भीमाजी गोडसे हिचे पती भिमाजी गोडसे यांचे अकस्मात निधन झाले. त्यांचा एक मुलगा व चार मुली यांचे संगोपन करण्याची जबाबदारी कारभारी दगडू गोरडे यांच्याकडून पडली स्वतःलाही एक मुलगा चार मुली असताना बहिणीच्या एक मुलगा व चार मुली असे दहा मुले सांभाळणे आणि तेही फक्त बिडी उद्योगावर सांभाळणे मोठे जिकरीचे काम होते. कल्पना करूनही आज अंगावर काटा येतो. तरीही त्यांची धर्मपत्नी गं. भा.विमल व त्यांनी मोठ्या जिद्दीने दहा मुलांचे संगोपन केले त्यांच्यावर चांगले संस्कार केले. त्यांच्या पत्नी विमल या त्या काळच्या इयत्ता ७ वी पास असून पिंपळगाव निपाणी ग्रामपंचायत मध्ये दहा वर्ष ग्रामपंचायत सदस्य होत्या. त्याही अतिशय शिस्तबद्ध विचारांच्या म्हणून गावात परिचित आहेत. आपल्या पतीच्या मागे त्या कायम सावली सारख्या उभ्या राहिल्या. गरिबीची हलकीची परिस्थिती असून सुद्धा दहा मुलांचं करूनही बिडी बांधण्याची कसरत त्यांना करावी लागत असे. त्यांचे आजारपण, पतीचे आजारपण इत्यादी सांभाळत आपला संसार तारेवरची कसरत करत सुरू ठेवला. आपल्या सर्व भावांबरोबर हरिभक्त परायण कारभारी दगडू गोरडे यांनी प्रेमाचे संबंध ठेवले.

बाबांच्या चारही मुली आपापल्या संसारात व्यवस्थित स्थिरस्थावर आहेत. बाबांचा मुलगा दत्तात्रय कारभारी गोरडे डिके या नावाने तालुक्यात / जिल्ह्यात सुपरिचित आहेत. सध्या ते संटूआई ट्रस्ट, पिंपळगाव निपाणी चे अध्यक्ष असून ग्राम सुरक्षा यंत्रणेचे महाराष्ट्र राज्याचे संचालक आहेत. गावातील नागरिकांना एकत्र करून त्यांनी आई संटूआई प्रतिष्ठानची ही स्थापना केलेली आहे. त्याद्वारे गावात विविध सामाजिक कामे त्यांच्या मार्गदर्शनाखाली होत असतात. बाबांचा धार्मिकतेचा वारसा ते समर्थपणे पुढे चालू ठेवतील यात शंका नाही. त्यांनी स्वखर्चाने केलेले मंदिराचे विकासकाम सर्व जिल्ह्यात प्रसिद्ध आहे. ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे आजवर ७५०० गावांना ते सुरक्षेची सेवा पुरवत आहेत. ५५०० पेक्षा जास्त दुर्दैवी घटनांमध्ये त्यांनी जीवित वित्तीय आणि टाळण्यासाठी मोलाची मदत केली आहे. आज ते 7 जिल्ह्यांमध्ये 70 लाख नागरिकांना ग्राम सुरक्षा यंत्रणेची सेवा पुरवून देशसेवा करत आहेत.

बाबांच्या पश्चात मोठा परिवार आहे.

गं.भा.विमल कारभारी गोरडे (पत्नी), श्री. दत्तात्रय कारभारी गोरडे DK (मुलगा), सौ नीलम दत्तात्रय गोरडे (सून), सौ. सुरेखा अशोक तळेकर (मुलगी), सौ शालन भास्कर दवंगे (मुलगी), सौ गीतांजली दत्तात्रेय टुपके (मुलगी), सौ भारती संदीप कासार (मुलगी), श्री अशोक नारायण तळेकर (जावई), श्री भास्कर भिमाजी दवंगे (जावई), श्री दत्तात्रेय रामराव टूपके (जावई), श्री संदीप रंगनाथ कासार (जावई), चि. नयन दत्तात्रय गोरडे (नातू), कु. दिव्या दत्तात्रय गोरडे (नात), गं. भा. इंदुबाई गोपीनाथ शेळके (बहीण), गं.भा. कुसुम भीमराव गोडसे (बहिण), सौ. कलावती चंद्रकांत एखंडे (बहीण), श्री लक्ष्मण मुरलीधर गोरडे (भाऊ), श्री दत्तू मुरलीधर गोरडे (भाऊ), श्री नानासाहेब मुरलीधर गोरडे (भाऊ), श्री धोंडीबा मुरलीधर गोरडे (भाऊ), श्री सचिन बाळासाहेब गोरडे (पुतण्या), श्री विठ्ठल दामोदर गोरडे (पुतण्या), श्री शंकर गंगाधर गोरडे (भाऊ), श्री माधव गंगाधर गोरडे (भाऊ), श्री भाऊसाहेब गंगाधर गोरडे (भाऊ), श्री सोपान गंगाधर गोरडे (भाऊ),श्री भानुदास गंगाधर गोरडे (भाऊ), संत श्री वेदांत सागर गुरुजी उर्फ प्राध्यापक डॉक्टर नामदेव दामू गोर्डे (पुतण्या) तसेच नातवंडे पतवंडे असा मोठा परिवार आहे. निधनापासून दररोज घरी गरुड पुराणाचे वाचन हरिभक्त पारायण बाळासाहेब महाराज हासे करत असून दशक्रिया निमित्त हरिभक्त पारायण अनिल महाराज तळपे गर्दनी यांचे संगीत प्रवचन होत आहे. सलग दहा दिवस पंचक्रोशीतील सर्व भजनी मंडळ घरी येवून भजन करून बाबांना श्रद्धांजली अर्पण करत आहेत.

## बाबांच्या मुलींची श्रद्धांजली

(समर्थ गांवकरी)

सुरेखा अशोक तळेकर (मुलगी)
शालन भास्कर दवंगे (मुलगी)
गीतांजली दत्तात्रय टूपके (मुलगी)
भारती संदीप कासार (मुलगी)

जगी ऐसा बाप व्हावा ...त्याचा
वंश मुक्तीस जावा ...

रात्री हा अभंग ऐकला. खरंच अण्णा, तुम्ही आमच्यासाठी काय होता हे शब्दात मांडणं जितकं कठीण, तितकच आठवणींच्या पिटाऱ्यातून तुमच्या बरोबर घालवलेले सुंदर क्षणांवर लिहिणं सुद्धा कठीण. अण्णा बाई तुमची दोघांची जोडी ..आम्ही कधी कल्पनाही करू शकत नाही.. बाई.. एकटी पाहू शकत नाही. जेव्हा तुम्हाला आठवण्याची वेळ येईल तेव्हा दोघेही बरोबरच आठवतात. कारण आम्हला जेव्हापासून कळायला लागले तेव्हापासून आम्ही तुम्हाला बरोबर काम करताना बघितले. बरोबर गप्पा मारताना दिसले, बरोबर हसताना दिसले. कुटुंबाची बांधणी करताना तुमच्या दोघांतील नातं किती घट्ट व किती चांगले असेल हे आज आम्ही जेव्हा आमचे कुटुंब सावरण्याचा प्रयत्न करतो तेव्हा वेळोवेळी जाणवते. एका मुलाला वाढवण्यासाठी आमची होणारी धडपड आणि आम्हाला करावा लागणारा संघर्ष पाहता तुम्ही जगलेला आयुष्य किती कष्टाचे असेल याची जाणीव होते. अण्णा तुमच्यासोबत सायकल वरचे ते प्रवास, प्रत्येक प्रजासत्ताक दिनी ,स्वातंत्र्यदिनी ,तुमच्या बाजूला उभे राहून स्वातंत्र्य गीत गाण्याचे अनुभव ,तुमच्या पेटीची साथ व मनातला सार्थ अभिमान आजही असे वाटते तुम्ही बाजूला बसावं. शिक्षणाप्रती तुमची असलेली धडपड तुम्ही जाहीर केलेले बक्षिसे शाळेत पहिल्या नंबरला अण्णांचे बक्षीस म्हणजे एक पर्वणीच. बालपणी तुमच्या सोबतीने घालवलेला काळ आजही मनाला खूप सुखावून जातो. आज जेव्हा संघटनांमध्ये काम करताना मुलींबद्दल उदासीनता दिसून येते तेव्हा अण्णा तुमच्याबद्दल आणखी अभिमान वाटतो. मुलींना वाढवताना तुम्ही कधीही भेदभाव केला नाही किंवा आईला कधी दुय्यम वागणूक दिली नाही. कुटुंबाच्या गाडा ओढताना तुम्ही तिला सोबतीने घेऊन चाललात तिच्या निर्णयांचा नेहमी आदर केला. मुलींबद्दल चे निर्णय घेतानाही तिचा पहिल्यांदा विचार घेतला या गोष्टीचा अण्णा आज मला खूप अभिमान वाटतो आणि तुमच्या याच कुटुंबातील



संस्कारांमुळे आम्ही मुलीही खूप कणखर बनलो. मामांच्या प्रती तुमचा असणारा आदर सन्मान या गोष्टींवरून तुम्ही नातेसंबंधात किती गोडवा राखला हे समजते. अण्णा तुम्ही कधी जास्त बोलला नाहीत पण मुलीच्या सासरची चौकशी अगदी मोजके दोन-तीन शब्दात कधी करून जायचे कळलेच नाही. आज असं वाटतंय, आता कुठून तरी याल व विचाराल पाहुणे कधी येणार. जावयांना कधी कुठल्याही गोष्टीबाबत तुमच्याकडून विचारणा नाही. आल्यानंतर एक राम राम व जेवण करण्याचा आग्रह याव्यतिरिक्त काही नाही. मुलीलाही अगदी दोन शब्दात खुशाली विचारणं गोड हसणं या पलीकडे काही नाही. तुम्ही नेहमीच सगळ्यांचे लाडके राहिले. आजीचे लाडके, आमच्या मामांचे लाडके, जावयांचे लाडके, सगळ्या व्याही चे लाडके, गावकऱ्यांचे लाडके, भजनी मंडळाचे लाडके, आमच्या सासरच्या ज्येष्ठांचे लाडके, पूर्ण नातेगोत्यात नातेसंबंधात अण्णा तुम्ही खूप माणुसकी कमवली. शांत व संयमी स्वभावाचे तुम्ही जिवंत होते उदाहरण ठरलात. अण्णा आज तुमच्याशिवाय माहेर अपूर्ण वाटतंय. तरीही घराच्या प्रत्येक कोपऱ्यात विशेषता देवघरात तुमची आठवण नेहमीच जागी राहील तुमचा पहाटेचा काकडा, देवपूजा,अभंग.. व सायंकाळचा हरिपाठ.

अण्णा या शब्दातच खरंच आमचं विश्व होतं. ते विश्व खूप सुंदर होतं. पण आता ते नाहीये. अण्णा जेव्हापासून कळायला लागले तेव्हापासून आम्ही शिकत शिकत मोठी झालो. खरं तर संस्कार ही गोष्ट वेगळी करण्याची नसतेच हे तुम्हीच आम्हाला शिकवलं. आपल्या घरातील वागणं बोलणं यावरच मुलं घडत असतात यावर तुमचा ठाम विश्वास होता. त्यामुळे तुम्ही घरात वागताना बोलताना नेहमी मर्यादा पाळल्या. तुमचा शांत मितभाषी स्वभाव हा मनाला खूप उभारी देऊन जातो. आयुष्यात जगण्याची कला ही आम्ही तुमच्या दोघांमुळे शिकलो. जगात बाहेर बघत असताना आपण एवढं खंबीर कसे यावर विचार केला असता उत्तर मिळतं अण्णा आणि बाई. खरच तुम्ही सुशिक्षित होतात, संस्कारी होता, अध्यात्माची जोड तुम्ही तुमच्या संसाराला लावली ती खूप छान गोष्ट आहे. आज आम्ही शिदोरीच्या रूपाने आमच्याबरोबर ते घेत आहोत. आज तुम्ही आमच्यात नाही पण येणारे जाणारे भेटणारे लोक येतात, तेव्हा त्यांच्या जवळ बसून तुमच्या आठवणी आम्ही ऐकत असतो. अनावधानानेच डोळे पाणवतात. आम्ही पाचही भावंड कायमच एकत्र राहू एकमेकाला साथ देऊ.

माहेरी आल्यानंतर आमच्या सगळ्यांच्या गलक्यात तुमचा आवाज अगदी स्पष्ट व कणखर घुमत असायचा तो आजही जाणवतो व नेहमी जाणवत राहील. प्रत्येक भजनात तुमचा स्वर जाणवेल. माहेरपणाच्या आठवणीत अण्णा तुम्ही कधी आयुष्याच्या आठवणींमध्ये आठवावे लागतील असे स्वप्नातही वाटले नव्हते. आज तुम्हाला जाऊन दहा दिवस झाले भेटायला येणारा प्रत्येक व्यक्ती तुमच्याबद्दल जी काही आठवण सांगतो ती काळजाला भिडते. तुमच्याबद्दल ऐकताना मन भरून येते. आज लिहिताना शब्द थांबत नाही पण मन भरून येते... पांडुरंगाच्या सेवेतील तुमच्या अनमोल आत्म्याला निश्चितच तुमच्या लाडक्या पांडुरंगाने सुंदर असं स्थान दिलं असेल.....

अण्णा तुम्हाला आमच्याकडून भावपूर्ण आदरांजली

## अण्णा आज सगळे तुमच्याबद्दल खूप भरभरून बोलत आहेत

(समर्थ गांवकरी)

**दत्तात्रय कारभारी गोर्डे (DK) (मुलगा)**

अण्णा आज सगळे तुमच्याबद्दल खूप भरभरून बोलत आहेत तुमच्या आठवणींना उजाळा देत आहेत सगळेजण तुमच्याविषयी मनमोकळे करत आहेत. पण मी काय बोलू व किती बोलू. म्हणतात पुरुषाने रडायचं नसतं, मोठ्याने रडता येत नाही म्हणून मी रडत नाही. माझ्या डोळ्यातलं पाणी पाहिलं की मुलं कावरी बावरी होतात, आई माझ्याकडे बघते ,बहिणी जवळ येतात नंदा बघते... आज खरंच तुमची खुप आठवण येते, तुमच्या अंत्यविधीनंतर सगळ्यांनी मला घराच्या मुख्य द्वारात तुम्हाला आवाज द्यायला सांगितला कुठून तरी मन म्हणत होतं की आत्ताच घरातून आवाज ऐकायला येईल. नंदा, दादा आला बघ , गेट उघडायला जा.



रोज सायंकाळी 6 वाजता तुमचा फोन न चुकता यायचा. किती वाजता घरी येतोय, आम्ही जेवायला थांबलोय लवकर ये. कार्यालयाच्या कामासाठी नियमितपणे बाहेर फिरावे लागे, त्यावेळी सातत्याने दोन तीन तासांमध्ये एकदा तुमचा फोन यायचा गाडी हळू चालव, कुठपर्यंत पोहोचला, हॉटेलला पोहोचल्यावर मला फोन कर, तुझी मीटिंग कशी झाली, कार्यक्रम कसा झाला, असे नियमितपणे विचारायचे. पण आता उद्यापासून जेव्हा कामानिमित्त बाहेर पडेल त्यावेळी माझी काळजी करणारा फोन कोण करणार या विचाराने आजही डोळे भरून येतात. तालुक्यात कोणत्याही कार्यक्रमाला गेल्यावर ज्येष्ठ नागरिक, तुमचे जुने मित्रमंडळी, बिडी कामगार, भजनी मंडळ, न चुकता मला विचारायचे, दादांची तब्येत कशी आहे, त्यांना का नाही कार्यक्रमाला आणले, पुढील वेळी येताना नक्की घेऊन या. मला अभिमान वाटायचा कि माझे वडील किती लोकप्रिय आहेत लोक त्यांना किती आदर देतात.

मी शिक्षक व्हावं असा तुमचा ध्यास होता. पण अण्णा मला शिक्षक होण्यात रस नसल्यामुळे मी तुमचे स्वप्न पूर्ण करू शकलो नाही. पुढे मी माझ्या स्वभावानुसार काम करत गेलो. आयुष्याची दहा वर्ष संघर्षात घालावी लागली. या सर्व संघर्षात तुम्ही सातत्याने मागे उभा राहिलात. ऑटोमॅटिक डिपर स्विच या माझ्या संकल्पनेची केंद्र सरकारने दखल घेतल्यावर तुमचा ऊर अभिमानाने भरून आला होता. तुम्ही दिलेली ती शाबासकीची थाप आजही मला आठवते. त्यानंतर राज्य शासन, भारतीय रेल्वे यांच्याबरोबर केलेले काम आणि आत्ता करत असलेले पोलीस दाला बरोबरचे ग्राम सुरक्षा यंत्रणे चे काम यातील इत्यंभूत माहिती तुम्ही नियमितपणे माझ्याकडून घेत राहिलात. आगदी तुमच्या शेवटच्या दिवसापर्यंत ग्राम सुरक्षा यंत्रणेबद्दल मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्याबरोबर झालेल्या चर्चा, पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या चर्चा, ग्रामसुरक्षा यंत्रणेचे उद्घाटनाचे कार्यक्रम याबद्दल तुम्ही आवर्जून माहिती घेत राहिलात. वृत्तपत्रात ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या येणाऱ्या बातम्या त्या अनुषंगाने टीव्हीवर प्रसारित होणाऱ्या घटनांच्या बातम्या यावर तुम्ही सातत्याने माझ्याबरोबर चर्चा करत होतात. मी करत असलेल्या कामामुळे शेतकऱ्यांना/ गोरगरिबांना होत असलेला फायदा व त्याच्या बातम्या वृत्तपत्रात झळकल्यानंतर आवर्जून तुम्ही त्या सर्व बातम्या वाचत होतात घरी आल्यावर माझ्याबरोबर त्यावर चर्चा करत होतात. यापुढे असे आता होणार नाही. सर्व समाज शाबासकीची थाप देईल, पण एका बापाने पाठीवर थाप दिल्यावर मिळते त्या उबीसाठी मी कायमचा पोरका झालो.

चार वर्षांपूर्वी मी संटूआई ट्रस्ट अध्यक्ष झालो. मी गावाच्या राजकारणात पडावे असे तुम्हाला अजिबात वाटत नव्हते. मंदिराचा अध्यक्ष झाल्यावर तेथील अव्यवस्था पाहून मी मंदिरावर स्वत: खर्च करण्याचं ठरवलं. एवढ्या मोठ्या प्रमाणात रक्कम खर्च करण्यास तुम्ही कुठल्या \ प्रकारचे आढेवेढे न घेता मला संमती दिली. मंदिराचा अध्यक्ष झाल्यानंतर लक्षात आले की मंदिराकडे कोणती अशी मोठी रक्कम शिल्लक नाही. त्यानंतर तुमच्या परवानगीने मी, माझे विश्वस्त आणि ग्रामस्थांच्या सल्ल्याने मंदिराच्या हितासाठी केलेली विकास कामे केली . विकास कामे लोकांना इतकी आवडली की लोक तेव्हापासून मंदिरासाठी भरभरून दान देत आहेत. आज मंदिराचे वार्षिक उत्पन्न 18 लाखांवर पोचले आहे. ज्या दिवशी मी मंदिराचे सर्व काम पूर्ण केले त्या दिवशी मंदिराच्या गार्डनमध्ये तुम्ही आणि बाई यांनी बसून माझ्या विषयी काढलेले शाबासकीचे शब्द आजही माझ्या कानात घुमत आहेत.

आयुष्यभर वडिलांवर जे जे काही लिखाण मी वाचलं होतं लिहिलं होतं ऐकलं होतं.. ते आजवर तुमच्या रूपाने अनुभवलं. प्रत्येक गावात कित्येक दशक्रियांमध्ये मी श्रद्धांजली वाहिली, त्यात गेलेल्या व्यक्तीच्या कार्याबद्दल मी भरभरून सांगण्याचा प्रयत्न केला. पण आज मी कसे बोलू आणि काय बोलू..

अण्णा तुम्हाला माझ्याकडून भावपूर्ण आदरांजली

## दादा माझं एक आवडतं व्यक्तीमत्व होते : लक्ष्मण घायवट

(समर्थ गांवकरी)

माझं एक आवडतं व्यतिमत्व होते दादा. माझ्यासबोत ते नेहमी खुप प्रेमाने बोलायचे. त्यांच्या चेहऱ्यावर जे एक सात्विक तेज होते त्यामुळे ते नेहमी प्रत्येकाला आपले वाटायचे. त्यांच्या आवाजात खुप गोडवा असायचा. त्यामुळे त्यांचं बोलण आपलंस वाटायचं. मनाने ते अमृता सारखे शुद्ध होते. त्यामुळे



चेहऱ्यावर कायम हलकस स्मित असायच. त्यांना कायम भजन म्हणताना मी पाहिलं आहे. पेटीच्या सुरात जेव्हा त्यांचे सूर मिसळून जायचे ते ऐकत रहावे असे वाटायचे. भजनी मंडळी मधील ते एक देखणं रूप होत ते कायम स्मरणात रहाणार. रस्त्याने भेटले की आवर्जून थांबून बोलायचे. हा त्यांच्या स्वभावातील गोडवा कायम लक्षात राहील. मराठी शाळेत असल्यापासून त्यांना खुप जवळून ओळखायचो मी केवळ भजन आणि पेटी मुळे....बापाची जागा कोणीच घेऊ शकत नाही. त्यांच्या मुला मुलींचे वैभवशाली जीवन पाहून त्यांना नक्कीच खुप अभिमान वाटला असेल. बाप म्हणून कधी काळजीही केली असेल. पण ते त्यांच्या मुलाच्या कर्तृत्वावर आणि हिमतीवर विश्वास असल्याने ते निर्भय सुद्धा असतील. त्यांच्याबरोबर बोलेल्या प्रत्येकाला त्यांची आठवण येत राहील पण न बोललेल्यांनाही आता त्यांच्याशिवाय तो रस्ता पोरका वाटेल. सगळ्यांचं सुन्न सुन्न वाटत असेल. बाहेरगावी असल्याने त्यांचे अंत्यदर्शन माझ्या नाशबी आले नाही.

दादांना माझ्या घायवट परिवाराकडून भावपूर्ण श्रद्धांजली

## बाबांच्या जाण्याने गोर्डे कुटुंबाचे खूप मोठे नुकसान

(समर्थ गांवकरी)

1997 मध्ये मी सातवीत होतो भारतीय स्वातंत्र्याला 50 वर्ष पूर्ण झाली होती. शाळेत गाण्यांचा कार्यक्रम होता मग पेटी कोण वाजवणार हा प्रश्न पडला. अर्थातच सर्वांनी बाबांचे नाव घेतले .गाणी बसवण्यासाठी बाबा सात आठ दिवस रोज शाळेत यायचे. आम्हाला पेटी आणि सोबत गाणे ऐकायला खूप आवडायचे . ते गाणी बसवताना अधून मधून ते पण त्यांच्या सुंदर आवाजात खूप छान म्हणायचे. खुप दिवस झाले पण ती आठवण अजूनही स्पष्ट आहे. त्यात अजून एक म्हणजे विड्याचा कारखाना आमच्या घराजवळ. बाबांचे आणि आमच्या आजोबांचे खूप जिव्हाळ्याचे संबंध होते. अधून मधून आमचे आजोबा त्यांना बोलावून घ्यायचे आणि गप्पा मारत बसायचे. कारखाना सुटला की पाठोपाठ आजी पण यायच्या आणि मग गमतीजमती आणि टिंगल चालायच्या . जुनी माणसं एकमेकांचा खूप आदर करणारी आणि जिव्हाळा जपणारी होती. त्या दिवशी बाबांचा भजनाचा व्हिडिओ पाहिला आणि तेव्हाच जुन्या आठवणी जाग्या झाल्या आणि दोन तीन दिवसातच बाबा सोडून गेले. बाबांच्या जाण्याने गोर्डे कुटुंबाचे खूप मोठे नुकसान झाले आहे जे आता कधीही भरून येऊ शकत नाही. बाबांनी वाजवलेली पेटी आणि



प्रमोद जालिंदर वाकचौरे

म्हटलेले भजन खूप वेळा ऐकले आहे ते कायम स्मरणात राहतील.

माझं एक आबाबांना भावपूर्ण श्रद्धांजली.

मंत्री
जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ)
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in
दिनांक : ३/२/२०२६
२२७६/२०२६

शोक-संदेश

प्रति,
**श्री.दत्तात्रय कारभारी गोर्डे**
मु.पो.पिंपळगांव निपाणी, ता.अकोले
जि.अहिल्यानगर

महोदय,

आपले वडिल ह.भ.प.कारभारी दगडू गोर्डे यांचे दि.३/२/२०२६ रोजी निधन झाल्याचे वृत्त ऐकुन वाईट वाटले. दैवी शक्तीपुढे मानवी प्रयत्न असफल ठरतात.

आपले कुटुंबीयास झालेल्या दु:खामध्ये मी व माझे कुटुंबीय सहभागी आहोत. परमेश्वर त्यांचे आत्म्यास सद्‌गती देवो, ही प्रार्थना !

कळावे,

आपला स्नेहांकित,

(डॉ.राधाकृष्ण ए.विखे पाटील)

# डॉ. अरुणाताई ढेरे यांचा प्रेरणादायी संवाद

**टाकळी ढोकेश्वर :** (समर्थ गांवकरी)




जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, टाकळी ढोकेश्वर येथे ज्येष्ठ साहित्यिक, लोकसंस्कृती अभ्यासक व मराठी साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्षा डॉ. अरुणाताई ढेरे यांच्या उपस्थितीत ज्ञानाचा, संस्कारांचा अक्षरांशी नातं दृढ करण्याचा एक अर्थपूर्ण क्षण साकारला.

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारत त्यांच्या लेखनप्रवासाची, अभ्यासातील सातत्याची आणि मराठी भाषेच्या भवितव्याची उकल करून घेतली. डॉ. ढेरे यांनी संयत, स्पष्ट आणि अंतर्मुख करणाऱ्या शब्दांत सांगितले की, "वाचन ही सवय नसून संस्कार आहे." पुस्तकांमधून माणूस घडतो, विचार प्रगल्भ होतात आणि समाज संवेदनशील बनतो, असे त्यांनी अधोरेखित केले. शाळेत राबविण्यात येणाऱ्या मराठी भाषा संवर्धन उपक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक केले. स्वच्छ, प्रेरणादायी परिसर आणि शिक्षकांची तळमळ पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत दिसणारी जिज्ञासा हीच शाळेची खरी ताकद असल्याचे त्यांनी नमूद केले.

ही भेट विद्यार्थ्यांसाठी केवळ साहित्यिकांचा संवाद नव्हता, तर भविष्यातील वाटचालीसाठी मिळालेला दिशादर्शक दीप होता. अक्षरांचा हा संस्कार त्यांच्या आयुष्यात दीर्घकाळ प्रेरणेचा स्रोत ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. अजय ठुबे, मुख्याध्यापक राजेंद्र ठुबे, शिक्षकवृंद उपस्थित होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आनंद भंडारी साहेब यांच्या प्रेरक नेतृत्वातून उभारण्यात आलेल्या शाळेतील ग्रंथालयाला डॉ. अरुणाताई ढेरे यांनी भेट देत विशेष गौरव केला. विद्यार्थ्यांसाठी साकारलेले हे वाचनकेंद्र ज्ञानसंवर्धनाची प्रभावी पायाभरणी असल्याचे त्यांनी नमूद केले.




# आंतरमहाविद्यालयीन राज्य नाट्य स्पर्धेत एसजीजीएस अभियांत्रिकी महाविद्यालयाचे उल्लेखनीय यश

**नांदेड जिल्हा :** (समर्थ गांवकरी)

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन राज्य नाट्य स्पर्धा २०२६ अंतर्गत घेण्यात आलेल्या प्राथमिक फेरीत छत्रपती संभाजीनगर केंद्रातून नांदेड येथील श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेच्या गंधर्व ड्रम क्लबच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विषाद या एकांकिकेने उल्लेखनीय यश संपादन करत द्वितीय पारितोषिक पटकावले.

राज्यस्तरीय या प्रतिष्ठित स्पर्धेत विविध महाविद्यालयांतील दर्जेदार एकांकिकांमध्ये 'विषाद' या एकांकिकेने आपल्या आशयघन मांडणी, प्रभावी दिग्दर्शन आणि सशक्त अभिनयाच्या जोरावर परीक्षकांसह प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. सामाजिक वास्तव प्रभावीपणे उलगडून दाखवणाऱ्या या एकांकिकेने उपस्थितांवर खोलवर परिणाम साधला.

द्वितीय पारितोषिकासोबतच विषाद या एकांकिकेच्या संघाने विविध वैयक्तिक व तांत्रिक पारितोषिकांवर आपली ठसठशीत छाप उमटवत एकूण ₹१,००,०००/- (एक लाख रुपये) इतकी पारितोषिके पटकावली.

स्पर्धेतील मिळवलेली पारितोषिके पुढीलप्रमाणे - उत्कृष्ट (द्वितीय) दिग्दर्शन पारितोषिक : युवराज कौसडीकर, नेपथ्य (प्रथम) पारितोषिक : श्रेयस तळणकर व संघ, उत्कृष्ट रंगभूषा (द्वितीय) पारितोषिक : श्रावणी खंदारे,उत्कृष्ट अभिनय – रौप्यपदक : श्रावणी खंदारे

या घवघवीत यशामुळे विषाद एकांकिकेच्या संघाने संस्थेच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेत मोलाची भर पडली असून, संस्थेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळत असल्याचे अधोरेखित झाले आहे. या स्पर्धेची अंतिम फेरी लवकरच मुंबई येथे पार पडणार असून, त्यासाठी विषाद या एकांकिकेची निवड झाली आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे, विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता प्रा. संजय देठे तसेच गंधर्व ड्रम क्लबच्या समन्वयक डॉ. उषा कांबळे, डॉ.विजया थुल सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यांनी संपूर्ण एकांकिका संघाचे अभिनंदन करत अंतिम फेरीसाठी शुभेच्छा दिल्या व विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस प्रोत्साहन दिले.

# बिडीकामगार म्हणून त्यांची ख्याती

(समर्थ गांवकरी)


मा. श्री. नानासाहेब दळवी

काकांबद्दल बोलायचं म्हटले तर एक बिडीकामगार म्हणून त्यांची ख्याती होती. शेतीचे फार उत्पन्न नसायच. भजनाच्या निमित्ताने आम्ही नेहमीच बरोबर असायचो. काका म्हणजे एक (हार्मोनियमवादक) पेटीमास्तर म्हणून तालुक्यात प्रसिद्ध होते. दुर्गा, कलावती, बागेश्वरी, मालकंस सारंग अशा अनेक स्वर रागांवर त्यांची पकड होती. भजनामध्ये ते नेहमीच वेगवेगळे अभंग म्हणत असत, "एक गाऊ आम्ही विठोबाचे नाम । अनिकांचे काम नाही आता॥" मोडूनिया वाटा सूक्ष्मदुस्तर । केला राज्यभर चाले ऐसा॥ व *देहुडा चरणी वाजवितो वेणु | गोपिकारमणु स्वामी माझा॥१॥* देखिला गे माये यमुनेचे तीरीं | हात खांद्यावरी राधिकेच्या ॥2॥ असे अनेक अभंग आणि गवळणी त्यांचे मुखदगत होते त्यांचे खास वैशिष्ट्य म्हणजे शेवटच्या क्षणापर्यंत नित्य नेमाचा हरिपाठ आणि काकडा शेवटपर्यंत चालू होता. ते पूर्णपणे वारकरी जीवन जगले. त्यांनी मला भजन करायला शिकवले. ते नेहमी हार्मोनियम शिकण्या साठी प्रेरित करत होते. परंतु माझ्या कामाच्या व्यापामुळे मला ते शिकता आले नाही. त्या गोष्टींची आयुष्यभर खंत माझ्या मनामध्ये राहील. खरतर काकांच्या सामाजिक कामाची आठवण दर 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारीला या राष्ट्रीय सणांना होत राहील कारण ते नेहमी मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी पहिली ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना एक ते तीन नंबर पर्यंत नेहमी बक्षीस देत असायचे. ज्या काळामध्ये एक रुपया हा गाडीच्या चाकासारखा असायचा त्या काळामध्ये शंभर रुपये, दीडशे रुपये, अडीचशे रुपये अशा प्रकारचे बक्षीस ते विद्यार्थ्यांना देत असत. विद्यार्थी सुद्धा एक नंबर च बक्षीस घ्यायचं म्हणून अभ्यास करायचे. आज तेच विद्यार्थी केंद्र शासन, राज्य शासनाच्या उच्च पदांवर काम करत आहेत. त्यामुळे आजही ते सर्व विद्यार्थी काकांना आदराने भेटायला आज पर्यंत येत असत. बक्षिसांची त्यांची परंपरा त्यांच्या मुलाने म्हणजे डी.के. गोर्डे साहेबांनी आजही सुरु ठेवली आहे. अश्या काकांच्या अनेक आठवणी आहेत. काकांना दुःखीत अंतःकरण पूर्वक भावपुर्ण श्रद्धांजली.

॥ जय भगवान ॥
**SHREE N. K. T. THANAWALA**
*Charitable Trust*
Dhanlaxmi Chambers, 6th Floor, Thane (West) 400 601. Tel : 2536 23 45
(Trust Reg. No. E-18705/THN)

Ref No. ______ Date दि.१०/२/२०२६

-:शोक संदेश:-
ह.भ.प.कै.कारभारी दगडु गोर्डे यांना भावपूर्ण श्रध्दांजली

आपले वडील ह.भ.प.कै.कारभारी दगडु गोर्डे त्यांचा निधन झाला त्यांची माहिती श्रीकांत यानी आज रोजी दिली.त्यांची दशक्रिया विधी दि.१२/२/२०२६ रोजी आहे.तरी पशुदवाखानात खास पशुसाठी भागवत कथा ठेवण्यात आली आहे.
तरी मी दशक्रिया दिवशी येवू शकणार नाही.
मात्र तुम्हाला फोन करुन जरुर भेटायला येईल.आपले वडिल वर्षा पासून देवाचा नाव भोजन व भजन व लोकांना संगी ठेवून सहयोग देत असते.आपला परिवार मधे जे हानि झाली आहे ते कदी विसरु शकणार नाही.कारण आपली संस्कृति मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्य देवो भव, अतिथीदेवो भव, ते सर्व मध्ये आई वडिलांचा स्थान सर्व पासून मोठा आहे,पण आपण सर्वाना एक दिवशी देवाकडे जायचा आसतो जे देवाना नाव घेत असते त्यांना मोक्ष कायम मिळतो.
तरी आपण सर्व परिवार त्याची कमी कायम राहणार पण तेंच्या आर्शिवाद आपल्या बरोबर कायम असतो आणि चांगले कर्म मुळे ज आपल्याला लाखो आर्शिवाद मिळु शकते.
आपल्या परिवाराला त्यांची कमी कायम जाणवणार पण त्याचे आर्शिवाद सतत आपल्यासोबत असतील.पूर्ण परिवारला हे दु:ख सहन करण्याची शक्ती परमेश्वर आपल्याला देवो अशी देवाकडे प्रार्थना. दशक्रियामधे येणारे सर्वाना माझी आठवण द्यावी. जय भगवान!!

शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला
प्रमुख

# आण्णा म्हणजे कुटुंबाचा भक्कम आधार

(समर्थ गांवकरी)


संत श्री वेदांत सागर उर्फ प्राध्यापक डॉक्टर नामदेव दामू गोरडे

आण्णा म्हणजे कुटुंबाचा भक्कम आधार, काबाडकष्ट करून मुलांचे भविष्य घडवणारा कणखर कणा आणि मायेचा पाझर असलेला वटवृक्ष होय. कित्येक अभंगातून बापाची महानता, त्याग आणि प्रेम व्यक्त केले जाते. बाप हा घराचा पाया असून, तो स्वतः ऊन-वारा सोसून कुटुंबाला सावली देतो अगदी या प्रमाणे आण्णांचे जीवन राहिले.

"जगीं ऐसा बाप व्हावा ।
ज्याचा वटवृक्ष छाया,
ऊन्-वारा सोसूनि पोरं,
जपली ज्याची माया..."

आण्णा हे कुटुंबाचे आधारस्तंभ होते. जसा वटवृक्ष सगळ्यांना सावली देतो, अगदी तसेच आण्णांनी १० मुले नातू पणतू यांना सांभाळले. आयुष्यातील सर्वातील मोठी व्यक्ती म्हणजे बाप. जी आपल्या आयुष्यात नसेल तर आपली आयुष्यात कशाची तरी कमतरता आहे, हे आपल्याला कळते. बाप म्हणजे आयुष्यातील अशी व्यक्ती जी शब्दात सांगता येत नाही. ज्या ठिकाणी बाप हा शब्द लागतो तेव्हा आपल्याला आयुष्याला आधार देणाऱ्या व्यक्तीची आठवण होते. बापाचं एक वैशिष्ट हे ही आहे की, तो दूनियातील कोणतेही दुःख पाचवण्याच सामर्थ्य ठेवतो. बाप हा शब्द दुःख सामावून घेण्यासाठी तयार झाला आहे, अस मला तरी वाटत. कारण माझ्या आयुष्यात या शब्दाला तर खूप महत्त्वाचं आहे. माझे वडील गेले त्यावेळी मी ध्यान-धारणा तपस्या करण्यासाठी गावापासून दूर खूप दूर गेलो होतो.मला त्यांचे अंतिम दर्शनही घेता आले नाही. परंतु मी ज्यावेळी ३० वर्षानंतर गावात आलो त्यावेळी माझ्या पाठीवर प्रेमाची थाप देणारा बाप माणूस म्हणजे आण्णा होते.30 वर्षा नंतर प्रथम मी जेव्हा भेटलो तेव्हा आमच्या दोघांमध्ये फक्त नजरेने संवाद झाला. बाकी आम्ही दोघेही निशब्द . मला असे वाटले मी कालच आण्णांना सोडून गेलोय अशा पद्धतीने लगेच आमचे बोलणे चर्चा सुरु झाल्या.त्यानंतर साधारण दीड वर्ष ते रोज माझ्या संपर्कात राहिले. ते रोज माझी चौकशी करत असत.अगदी मी आज काय जेवल केले हे हि त्यांना सांगावे लागे. ३० वर्षात मला असे कुणीही कधी प्रेमाने विचारले नाही कि बाळा तू जेवला का? तुझी तब्येत कशी आहे? ज्या गोष्टींसाठी मी व्याकुळ झालो होतो ते सर्व राहिलेले प्रेम मला व्याजासह आण्णा व बाई च्या रूपाने मिळाले. दत्ता (DK) ने व माझ्या सर्व बहिणींनी आण्णाचा आदरपूर्वक सांभाळ केला. मला अभिमान वाटतो ईश्वराने काय न्याय केला माहित नाही. अण्णांनी मला भेटण्यासाठी ज्या दिवशी बोलावले त्याच दिवशी त्यांनी देह ठेवला. इतक्या वर्षांनी जे प्रेम मला मिळाले होते ते एका क्षणात ईश्वराने हिरावले. ईश्वर माझ्या आण्णांना त्यांच्या चरणी जागा देवो. भावपूर्ण श्रद्धांजली.

# आज शब्द कमी पडत आहेत...

(समर्थ गांवकरी)


नीलम दत्तात्रय गोर्डे (सून)

आज बोलताना शब्द कमी पडत आहेत. कारण आज मी सासऱ्यांबद्दल नाही, तर माझ्या आण्णांबद्दल बोलते आहे. आण्णा म्हणजे फक्त घरापुरते माणूस नव्हते, ते संपूर्ण गावासाठी एक सवय, एक विश्वास होते.

"आहे तेवढ्यात समाधान मानायला शिकवणारे". आण्णा आम्हाला कायम सांगायचे — जे आहे त्यात सुख शोधायला शिका. त्यांची एक ठाम शिकवण होती — "पोरांनी बाहेर खायची सवय ठेवू नये." घरचं अन्न, घरची माया, घरची शिस्त यालाच त्यांनी नेहमी महत्त्व दिलं. प्रत्येक माणसाने घरातून जेवूनच कामाला, बाहेर जायला पाहिजे. हे त्यांनी आम्हाला शिकवलं. आपण काही ना काही दान करायला पाहिजे हे फक्त बोलून नाही, तर करून दाखवणारे आण्णा होते. कोणी मदतीसाठी आलं तर कधीच रिकाम्या हाताने परत पाठवलं नाही. आण्णांना त्यांचा वाढदिवस करायला फार आवडायचा. आणि ते नेहमी हसत म्हणायचे — "माझं पैसे, पेन्शन आली की मी साठवून ठेवत नाही, वाटून देतो." हेच त्यांचं आयुष्याचं तत्व होतं. नातवांवर तर त्यांचं विशेष प्रेम होतं. रोज शाळेतून नयन, दिव्याला आणायला स्कूल बस येण्याआधीच आण्णा स्टॉपवर हजर असायचे. एखाद्या दिवशी ते दिसले नाहीत तर पूर्ण गावाला प्रश्न पडायचा — "आज आण्णा का नाही आले?"

आज मुलांना जे काही चांगले संस्कार मिळाले आहेत, ती फक्त त्यांच्या स्वतःच्या मुलांसाठी नव्हती, तर सगळ्या गावासाठी दिलेली शिकवण होती. आणि माझ्यासाठी... "नंदा, आज ही भाजी बनव... ती भाजी बनव..." असं हक्कानं, मायेने बोलणारे शब्द आज या आवाजाला कान खूप तरसले आहेत. आता ते शब्द कोण सांगणार? आण्णांनी मला कधीच मी या घरची सुन आहे असे वाटू दिली नाही, नेहमी स्वतःच्या मुलीसारखं जपलं.

तुमची सेवा अजून करावीशी वाटते, पण ते नशीब आता फक्त आठवणीत उरलं आहे. आण्णा शारीरिक रूपात आमच्यात नसतील, पण त्यांनी दिलेले संस्कार, प्रेम आणि माणुसकी आमच्या आयुष्यात कायम जिवंत राहील. देव तुमच्या आत्म्याला शांती देवो, आणि आम्हाला तुमच्या शिकवणीनुसार जगण्याचं बळ देवो.

राम कृष्ण हरी.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/१४/२०२६ अकोले दि. ११/०२/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्रीम. काळूबाई ठका उघडे, रा. पांजरे,** ता.अकोले, जि.अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **यांचा स्वतः काळूबाई ठका उघडे यांचा जन्म दि. ०१/०१/२००३ रोजी पांजरे** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **पांजरे,** ता. अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्रीम. काळूबाई ठका उघडे, रा. पांजरे,** ता.अकोले, जि.अहिल्यानगर **यांचा स्वतः काळूबाई ठका उघडे यांचा जन्म दि. ०१/०१/२००३ रोजी पांजरे** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **पांजरे,** ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ११/०२/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**
**कामगिरी क्लर्क** **तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी उपक्रम

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)



जवाहर नवोदय विद्यालय, ता. पारनेर येथे दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी "प्रेरणा उत्सव–२०२६" हा शैक्षणिक व व्यक्तिमत्त्व विकासात्मक उपक्रम यशस्वीपणे पार पडला. या उपक्रमात अहिल्यानगर जिल्ह्यातील एकूण ३० शाळांमधील ६१ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रभारी प्राचार्य श्री. जी. बी. मुन्नरवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. यावेळी परीक्षक व मूल्यमापकांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची उद्दिष्टे, दृष्टीकोन व महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. पी. बी. पवार यांनी प्रभावीपणे केले.

प्रारंभी 'प्रेरणा उत्सव' विषयक माहितीपट सादर करण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांना उपक्रमाची संकल्पना, उद्दिष्टे व अपेक्षित परिणाम यांची सुस्पष्ट माहिती मिळाली. पुढील टप्प्यात विद्यार्थ्यांचे विविध गट तयार करून सर्जनशीलता, नेतृत्वगुण, संघभावना आणि समावेशक सहभाग वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले.

या उत्सवात चर्चा सत्रे, कार्यशाळा, कलात्मक अभिव्यक्ती, सादरीकरणे तसेच अनुभवाधारित उपक्रमांचा समावेश होता. संवाद कौशल्य, आत्मशिस्त, भावनिक बुद्धिमत्ता व जबाबदार नागरिकत्व या जीवनकौशल्यांवर विशेष भर देण्यात आला. कार्यक्रमातील कामगिरीच्या आधारे विद्यार्थ्यांची पारदर्शक व गुणवत्ताधारित निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक मुलाखती श्री. डी. व्ही. खिलारे (वरिष्ठ शिक्षक जेएनवि) सौ. वृषाली कोचेवाड व सौ. स्वाती आहिरे (नवनाथ विद्यालय, करंजी) यांच्या तज्ज्ञ समितीद्वारे घेण्यात आल्या.

संपूर्ण मूल्यमापन प्रक्रिया श्री. के. जी. पाटील ,श्री. आर. आर. फंड श्री. राहुल राज भारती ,सौ. एस. के. लोखंडे ,सौ. दीपा मूर्ती, श्री. शीतलकुमार गोरे, सौ. संगीता पाचरे व सौ. शैला औटी यांच्या सहकार्याने काटेकोरपणे पार पाडण्यात आली.

समारोप सत्रात विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाबाबत समाधानकारक व प्रेरणादायी प्रतिक्रिया व्यक्त केल्या. प्रेरणा उत्सव–२०२६ हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी व दिशादर्शक ठरला, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# महापौरपदी कविता मुळे तर उपमहापौरपदी दिपक सिंह रावत

**नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)**




नांदेड वाघाळा महानगरपालिकेत गेल्या तीन वर्षा पासून प्रशासकराज चालू होता आज दिनांक १० फेब्रुवारी रोजी महापौर पदी कविता मुळे तर उप महापौर पदी दीपक सिंग रावत यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न झाला आहे महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खासदार अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पदग्रहण सोहळा संपन्न झाला आहे यावेळी खासदार अशोकराव चव्हाण म्हणाले की नांदेडमध्ये सर्व पदाधिकाऱ्यांनी जनसामान्य जनतेच्या न्याय हक्कासाठी काम केले पाहिजे व महानगरपालिकेचे पूर्ण काम पारदर्शकपणे कारभार चालून महानगरपालिकेच्या कामकाजाच्या पावत्या जनतेला दिल्या पाहिजेत यासाठीसर्व नगरसेवकांनी प्रयत्न केले पाहिजे यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे उद्गार खासदार अशोक चव्हाण यांनी केले आहे आज महापौर पदाची निवडणूक पार पडली त्यात भारतीय जनता पार्टीच्या सौ कविता संतोष मुळे यांची महापौर पदी विराजमान झाल्या तर उपमहापौर पदी दीपक सिंग रावत यांची निवड झाली सभागृह नेते पदी महापौर यांनी अॅड महेश कनकदंडे यांची नियुक्ती केली याप्रसंगी सर्व नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते तसेच सर्व सामान्य जनता मोठ्या प्रमाणात उपस्थित होती सर्वप्रथम मनपा आयुक्त डॉक्टर महेश कुमार डोईफोडे यांनी सांगितले की जून २०२२ पासून सुरू असलेले प्रशासकराज आज समाप्त झाले हे प्रशासकराज तीन वर्ष तीन महिने नऊ दिवस चालले चालले या कालखंडात केलेल्या कामाची यादी त्यांनी वाचून दाखवली आणि भारतीय जनता पार्टीच्या संकल्प नाम्या नुसार जनतेने तुम्हाला मतदान करून तुमच्या संकल्पना मंजूर केल्याचे सांगितले या प्रसंगी भाजपा अध्यक्ष अमर राजूरकर यांनी २८ वर्षानंतर भारतीय जनता पार्टीचा महापौर व उपमहापौर नांदेड मध्ये विराजमान झाला त्यांनी सांगितले की देशात नरेंद्र मोदी सरकार राज्यात देवेंद्र फडणवीस सरकार आणि नांदेडमध्ये भाजपा सरकार मी काँग्रेसवाल्यांना सांगू इच्छितो की कैसे बनाया असे उद्गार त्यांनी काढले तर यावेळी आमदार बालाजी कल्याणकर यांनी आमच्या नगरसेवकांची सत्ताधारी पक्षाला आमचा बिनर्शत पाठिंबा असल्याचे सांगितले दीपक सिंह रावत म्हणाले की आता जाणतारात सुरू झाले आहे प्रशासनाने जनतेतील सर्व सामान्याचे कामे पदाधिकाऱ्यांचे असते सभागृहात राष्ट्रगान सुरू असताना एमआयएमचे नगरसेवक निघून गेले याचा निषेध उपमहापौर दिपकसिंह रावत यांनी केला यावेळी केला महापौर कविता संतोष मुळे म्हणाल्या की मला विकासासाठी ही खुर्ची मिळाली आहे त्यासाठी मी कटिबद्ध आहे अशोकराव चव्हाण यांच्या संकल्पनेतील नांदेड शहर बनविणार या प्रसंगी खासदार डॉ अजित गोपछेडे म्हणाले की अशोक चव्हाण यांनी आणि त्यांच्या टीमने मागील महिन्याभरात केलेल्या नियंतीला जनतेने महिनाभरात जनतेने महिन्याभरात केलेल्या मेहनतीला जनतेने त्यांना ४५ सदस्य निवडून देऊन गुणवत्ता यादीत उत्तीर्ण केले आहे निवडून आलेल्या भाजप सदस्यांमध्ये २६ महिला आहेत म्हणजे मोदींचा महिला राग हा संकल्प तुम्ही पूर्ण करत आहात हे सांगताना खासदार डॉ अजित गोपछेडे यांनी महत्त्वाची बाब सांगितली की आयुक्त महेश कुमार डोईफोडे यांनी ८३ लाख रुपये केंद्र सरकारला परत केले आहेत आणि त्यांचे कौतुक केले आहे सोबतच मागच्या निवडणुकीच्या काळात अमरनाथ राजूरकर यांनी केलेल्या मेहनतीचे कौतुक करत त्यांच्यावर कृपादृष्टी ठेवा असे खासदार अशोक चव्हाण यांना सांगितले सोबतच अमरनाथ राजूरकर यांनी ही तुम्हाला सांगायला सांगायला सांगितले नाही हे सुद्धा स्पष्ट केले.



ठाणे : ठाणे महापौर शर्मिला पिंपोळकर व उपमहापौर कृष्णा पाटील यांनी ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरव राव, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व भाजप ठाणे जिल्हाध्यक्ष संदीप लेले यांच्या उपस्थितीत आज आपला पदभार स्वीकारला. प्रसंगी अनेकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. (फोटो - संतोष पडवळ)

# दाभडकराच्या दणक्याने राष्ट्रीय महामार्गाचे तारे जमीनवर

**अर्धापूर: (समर्थ गांवकरी)**



तालुक्यातील दाभड हे गाव राष्ट्रीय महामार्गावर असल्याने गावात जाण्यासाठी भुयारी रस्ता करून द्यावा या मागणीसाठी ४ गावकऱ्यांनी दि.११ मंगळवारी रोजी राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनाची दखल घेत राष्ट्रीय महामार्गाचे अधिका-यांनी भुयारी रस्त्यासाठी मंजुरी मिळाली असल्याचे पत्र आंदोलकांना दिले त्यामुळे नागरिक दिलासा मिळाला आहे. दाभड राष्ट्रीय महामार्गावर वाहनांच्या धडकेत दोन महीला मृत्यू झाल्यामुळे दाभड,बामणी,शेलगाव खु.बुद्रुक गावकऱ्यांना राष्ट्रीय महामार्गावर जिव मुठीत धरून रस्ता पारकरावा लागतआहे. राष्ट्रीय महामार्गावरून या चार गावकऱ्यांनी सुरक्षित रस्ताने प्रवास करता यावा यासाठी २ तास रास्ता रोको आंदोलन केल्यामुळे राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांचे तारे जमीन वर आल्याने त्यांनी लगेच येऊन भुयारी मार्गाला मंजुरी मिळाली असल्याचे पत्र आंदोलकांना दिले. राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी वेळ काढून धोरण अवलंबन करत फक्त बनवाबनवी करत होता. त्यामुळे राष्ट्रीय महामार्गावर अपघातात वाढ होत होती व कोणतीही रस्ते पूर्ण होत नसल्याने जनतेला जीव मुठीत धरून राष्ट्रीय महामार्गावर प्रवास करावा लागत आहे. यासाठी लोकप्रतिनिधींनी राष्ट्रीय महामार्गाच्या बनवाबनवी ला लगाम घालावा अशी मागणी जनतेतून होत आहे. दाभड येथील जनतेने केलेल्या आंदोलनात महिलाही मोठ्या संख्येने सहभागी झाल्यामुळे राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी जमिनीवर येऊन तुमच्या सगळ्या मागण्या मान्य करतो आंदोलन मागे घ्या अशी विनंती करीत होते.

आंदोलन आंदोलकाच्या आक्रमक पवित्रामुळे चार गावच्या भुयारी पुलाचा प्रश्न मार्गी लागला असून भुयारी पुलामुळे चार गावांतील विद्यार्थी,शेतकरी, जनतेला दिलासा मिळणार आहे.

# दाभड जवळ वाहनाच्या धडकेत महिला ठार

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**



तालुक्यातील दाभड कडे येत असतांना महिलेला कारने जोरदार धडक दिल्याने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले डॉक्टरांनी महिलेस मृत घोषित केले. हि घटना दि.१० मंगळवारी रोजी सायंकाळी घडली असल्याची माहिती प्रत्यक्ष दर्शनी दिली आहे. दाभड येथील गावाकडे अनुसया बालाजी जाधव (वय ४५वर्ष)येत असतांना राष्ट्रीय महामार्गावर अर्धापूर कडे जाणारा कारने जिवो पेट्रोल पंपासमोर जोरदार धडक दिल्याने त्या अपघातात गंभीर जखमीं झाल्या होत्या.

# अहिल्यानगर-पुणे रेल्वे सेवांचा मुद्दा संसदेत : खा. नीलेश लंके




**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

खासदार नीलेश लंके यांनी बुधवारी संसदेत अहिल्यानगर-पुणे दरम्यान रेल्वे सेवांच्या संदर्भात महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करून केंद्र सरकारचे लक्ष वेधले. अहिल्यानगर हे मुंबई व पुणे जिल्ह्यांना जोडणारे औद्योगिक व ऐतिहासिक केंद्र असून, येथून दररोज हजारो विद्यार्थी, नोकरदार व व्यावसायिक पुणे व मुंबईकडे ये-जा करतात. ही वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता अहिल्यानगर-पुणे दरम्यान नवीन वंदे भारत किंवा इंटरसिटी रेल्वे सेवा सुरू करण्याबाबत सरकारचा विचार आहे का, अशी विचारणा त्यांनी केली. खा. लंके यांनी पुढे वंदे भारत स्लिपर कोच संदर्भात प्रश्न उपस्थित करत, अहिल्यानगरहून दिल्ली किंवा जम्मूसारख्या लांब पल्ल्याच्या मार्गांवर नव्या स्लिपर गाड्या सुरू करून त्यांचा थांबा अहिल्यानगर येथे देण्याचा सरकारचा विचार आहे का, असे विचारले. तसेच वंदे भारतसारख्या आधुनिक रेल्वे सेवांची संख्या वाढत असताना त्यांच्या तांत्रिक देखभालीसाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांबाबतही त्यांनी मुद्दा उपस्थित केला. अहिल्यानगर हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे रेल्वे केंद्र असल्याने येथे वंदे भारतसाठी स्वतंत्र मेंटनन्स डेपो स्थापन करण्याबाबत सरकार विचार करत आहे का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

रेल्वेतील खानपान व इतर सेवांमध्ये महाराष्ट्रातील स्थानिक पदार्थांचा समावेश तसेच स्थानिक बचत गट व सुशिक्षित बेरोजगारांना प्राधान्य देण्यासाठी विशेष धोरण तयार केले जाणार का, याचीही मागणी खा. लंके यांनी केली.या सर्व प्रश्नांना उत्तर देताना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, खासदार नीलेश लंके यांनी मांडलेल्या सूचनांची दखल घेण्यात आली असून त्यावर सकारात्मक निर्णय घेतला जाईल. महाराष्ट्रासाठी यंदा रेल्वे विकासासाठी २३ हजार ९२६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, सुमारे १ लाख कोटी रुपयांचे विविध रेल्वे प्रकल्प राज्यात सुरू आहेत.

# ७५७ ग्रामपंचायतींवरील प्रशासक नियुक्तीला स्थगिती




**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील ७५७ ग्रामपंचायतींची मुदत संपल्याने संबंधित ग्रामपंचायतींचा कारभार विस्तार अधिकारी दर्जाच्या प्रशासकांच्या हातात दिला जाणार होता. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनात सर्वच पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी प्रशासकांच्या नियुक्त्या केल्या होत्या.

मात्र, या प्रकरणी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल रिट याचिकेवर सुनावणी होवून प्रशासक नेमण्याच्या आदेशाला न्यायालयाने स्थगिती दिल्याने त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांनी गटविकास अधिकारी यांना पत्रक काढत प्रशासक नेमण्याची कार्यवाही न करण्याचे आदेश काढले आहेत.

नगर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत. त्यामुळे गट आणि गणातील इच्छुक डोळे लावून बसले आहेत. त्यातच, आता ७५७ ग्रामपंचायतींच्याही मुदती संपल्या आहेत.

यामुळे संबंधित ग्रामपंचायतींच्या सरपंचांचे अधिकार हे प्रशासकांकडे दिले जाणार होते. यापूर्वी डिसेंबर २०२५ अखेर मुदत संपलेल्या ११६ ग्रामपंचायतींच्या निवडणुका लांबल्याने त्या ठिकाणी अगोदरच प्रशासक नियुक्ती करण्यात आली आहे.

आता आणखी ७५७ ग्रामपंचायतींवर प्रशासन नेमले जाणार होते.या ठिकाणी कृषी, शिक्षण, पशुसंवर्धन विभागाचे विस्तार अधिकारी, पाणी पुरवठा उपअभियंता, तसेच अंगणवाडी पर्यवेक्षक अशा संवर्गातील अधिकाऱ्यांना प्रशासक म्हणून नियुक्त्या देण्यात येणार होत्या.

मात्र, प्रशासक नियुक्तीप्रकरणी अरविंद दळवी व इतर यांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठात रिट याचिका दाखल केली. त्यावर सुनावणी होवून पुढील आदेश होईपर्यंत कार्यवाही न करण्याच्या सुचना न्यायालयाने दिल्याने त्यानुसार जिल्हा परिषद प्रशासानाने मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याची कार्यवाही थांबवली आहे.

**या ठिकाणी प्रशासक नियुक्तीला स्थगिती**

अकोले ५१, संगमनेर ९४, श्रीरामपूर ३७,कोपरगाव 2 २९,राहाता २५, राहुरी ४४,नेवासा ५९, शेवगाव ४८, पाथर्डी ७७, जामखेड ४९,, श्रीगोंदा ५६, कर्जत ५४.

# जुन्नर शहर राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष यांना मातृशोक

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**



जुन्नर शहरातील जुन्या पिढीतील कुंदनकाकु भगवानसिंह खोत वय ९५ वर्ष यांचे निधन झाले आहे . यांच्या पाठीमागे तीन मुल, सुना , चुलते , पुतणे , नातवंडे असा मोठा परिवार आहे. माजी कृषिमंत्री शरद पवार व कृष्ण खोरे विकास महामंडळाचे माजी उपाध्यक्ष तथा माजी आमदार कै . वल्लभ बेनके यांच्या मार्गदर्शनाखाली शहराध्यक्ष धनराज उर्फ पापा खोत व शहर व्यापारी असोसिएशनचे माजी अध्यक्ष कन्हैया खोत या दोन्ही मुलांनी समाजसेवेचा ठसा उमटविला आहे .

# गुरू विठ्ठलनाथ महाराज देवस्थान महाशिवरात्री निमित्ताने अखंड दत्तनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन

**नांदेड: (समर्थ गांवकरी)**




श्री गुरु विठ्ठलनाथ महाराज देवस्थान तिर्थक्षेत्र गोपाळचावडी ता. जि. नांदेड येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महाशिवरात्री निमित्ताने अखंड दतनाम सप्ताह पालखी व महाप्रसादाचे आयोजन दि ११ ते १७ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आला आहे.

आपणास कळविण्यात अत्यंत आनंद होतो की, दरवर्षी प्रमाणे याही ५६ व्या वर्षी श्री. गुरु विठ्ठलनाथ महाराज मंदिर देवस्थान गोपाळचावडी ता. जि. नांदेड येथे अखंड दत्तनाम सप्ताह पालखी आयोजन करण्यात आले आहे,दि ११ फेब्रुवारी बुधवार पहाटे ५ वाजता श्री महंत आनंदबन महाराज गुरु गंभीरबन महाराज मठ संस्थान तुप्पा ता. जि. नांदेड यांच्या हस्ते महापुजा टाकून दत्तनाम सप्ताहास प्रारंभ व सात दिवस अखंड दत्तनाम सप्ताह सुरुवात होईल.दि. १७ फेब्रुवारी मंगळवार अमावस्येच्या दिवशी दुपारी १.३० वाजता त्रिभुज बबुत्रा व श्री गुरु विठ्ठलनाथ महाराज यांच्या समाधीचा महा अभिषेक,श्री समाधान महाराज यांच्या हस्ते होईल. सप्ताह समारोह दि. १७ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता होणाऱ्या कार्यक्रमास आ.आनंद बोंढारकर . विनय गिरडे . गंगाप्रसाद धोंडीबा काकडे (माजी जिल्हा परिषद सदस्य, मनोहर पाटील शिंदे माजी जिल्हा परिषद सदस्य, साहेबराव पाटील सेलुकर माजी सरपंच संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख प्रतिनिधी उदय देशमुख,सतिश बस्वदे,राजू लांडगे,सौ. सुरेखा प्रदिप लाखे (सरपंच, गोपाळचावडी),दलित मित्र माधव काशिनाथ आंबटवार,श्रीमती गिरजाबाई तुळशीराम डाकोरे (माजी सरपंच,गोपाळचावडी) दुपारी ३वाजता महाप्रसाद सुरुवात रात्री ठीक ७ वाजता गुरु विठ्ठलनाथ महाराज यांच्या पादुका पालखी सोहळा पालखी सोबत श्री दत्त भजनी मंडळ, गोपाळचावडी गावातील प्रमुख रस्त्याने निघेल व सांगता गुरु विठ्ठलनाथ महाराज देवस्थान येथे येईल,ठिक रात्री ८वाजता दोन भजनी मंडळाचा कार्यक्रम होईल. दत्तकृपा भजनी मंडळ ब्राह्मणवाडा ता. जि. नांदेड, प्रमुख द.भ.प. आनंद राजेमोड, गुरुमुर्ती भजनी मंडळ आलेगाव ता. कंधार जि. नांदेड, प्रमुख व.भ.प. गोविंद नागोराव मोरे आलेगांवकर,दि. १८ फेब्रुवारी रोजी बुधवारी पहाटे ५ वाजता काकडा आरती नंतर सप्ताहाची सांगता होईल.

# गोरक्षनाथ पायी दिंडीचे देऊळगाव गलांडे वरून गोरक्षनाथ गडाकडे प्रस्थान

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

ॐ शिव सिध्द चैतन्य गोरक्षनाथाच्या आशीर्वादाने सालाबादप्रमाणे याही वर्षी गुरुवर्य बबन(तात्या) काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाशिवरात्री निम्मित सिध्द गोरक्षनाथ मंदिर,देऊळगाव गलांडे,ता. श्रीगोंदा ते श्री क्षेत्र गोरक्षनाथगड (मांजरसुंभा) डोंगरगण,तालुका नगर पायी दिंडी चे आज देऊळगावगलांडे वरून प्रस्थान झाले. दिंडीत गुरुवर्य बबन (तात्या) काटकर यांच्यासह सुमारे ३५० च्यावर नाथभक्त सहभागी झाले आहेत दिंडीत भव्य रथ असुंन त्यामध्ये गोरक्षनाथाची प्रतिमा व पादुका आहेत तर सर्व नाथ भक्त च्या डोक्यावर भगव्या टोप्या आहेत. यामध्ये किर्तनकार दत्तात्रय महाराज ढोरजकर,केशव महाराज वाबर ,राजाराम महाराज साठे,सुभाष महाराज आळेकर,विद्याताई रेपाळे महाराज ,पखवाज वादक माऊली महाराज सौताडे व श्रीनिवास महाराज राजगुरु सहभागी झाले आहेत. दिंडी निघाल्यावर गोरक्षनाथ मंदिर, खांडगाव, महाडूळवाडी ला मुक्काम करण्यात असून आज दुसऱ्या दिवशी सिद्धेश्वर मंदिर मांडवगण, अंबिलवाडी, वाटेफळ येथे मुक्काम तर तिसऱ्या दिवशी वाकोडी फाटा,तुकड्डु ओढा येथे मुक्काम तर ४ थ्या दिवशी दरेवाडी हुन दिंडी नगरला येणार असून त्यावेळी नगरमधील नाथभक्त सहभागी होतात, वसंत टेकडी,आशीर्वाद लोण, नगर येथे दिंडी थांबणार आहे, तर मुक्काम शेंडी येथील दत्त मंदिरात होणार आहे , दिंडीत भाविक गोरक्षनाथांचा जयघोष करत नाथांची गाणे म्हणतात.

# भायुमोर्चा जिल्हाध्यक्ष स्वागत आयनेनिवार यांचे निवेदन

- नांदेड येथे विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांची भेट घेऊन विविध मागण्या मांडल्या

**किनवट : (समर्थ गांवकरी)**



किनवट रेल्वे स्थानकावरील वाढत्या प्रवासी संख्येच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांना भेडसावत असलेल्या विविध समस्यांकडे रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष स्वागत आयनेनीवार यांनी दक्षिण मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक प्रदीप कामले यांची नांदेड येथील विभागीय कार्यालयात भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी सुप्रसिद्ध व्यापारी केतन किनवटकर तसेच सामाजिक कार्यकर्ते अभिजित बोनगिरवार उपस्थित होते.

किनवट रेल्वे स्थानक हे नांदेड जिल्ह्यातील तसेच सीमाभागातील नागरिकांसाठी महत्त्वाचे दळणवळण केंद्र मानले जाते. किनवट शहरासह स.वि.म. परिसर, सुभाष नगर, मांडवा, बेल्लोरी, पिंपळगाव, मंगाबोडी, हटकरखोरी, झेंडिगुडा, घोगरवाडी, नागझरी कॅम्प, सोनापुर आणि परिसरातील अनेक गावांतील हजारो नागरिक दररोज या स्थानकाचा वापर करतात. विशेषतः शिक्षण, व्यवसाय, शासकीय कामकाज तसेच आरोग्यसेवेसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. मात्र स्थानकावर आवश्यक सुविधा अपुऱ्या असल्यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनाद्वारे रेल्वे प्रशासनाकडे स्थानक परिसरातील मूलभूत सुविधा वाढविणे, प्रवाशांसाठी सुरक्षित व सोयीस्कर प्रवेशमार्ग उपलब्ध करणे तसेच शहराशी जोडणाऱ्या महत्त्वाच्या मार्गांवरील अपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली. किनवट रेल्वे स्थानकाचा परिसर वेगाने विकसित होत असून भविष्यात प्रवासी संख्या अधिक वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन नियोजनबद्ध पायाभूत सुविधा उभारण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली.

स्वागत आयनेनीवार यांनी यावेळी रेल्वे प्रशासनास सांगितले की, स्थानिक नागरिकांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या समस्या सोडविल्यास प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल तसेच रेल्वे सेवांचा वापर अधिक सुरक्षित व सुलभ होईल. या मागण्यांकडे रेल्वे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

किनवट रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक २ च्या पूर्वेकडील बाजूस सध्या कोणताही सुयोग्य अप्रोच रोड, वाहन पार्किंग व्यवस्था तसेच प्रवाशांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. या भागातून मोठ्या प्रमाणात नागरिक रेल्वे स्थानकाचा वापर करतात. मात्र स्थानकाचे मुख्य प्रवेशद्वार विरुद्ध दिशेला असल्यामुळे नागरिकांना रेल्वे स्थानकात प्रवेश करण्यासाठी मोठा फेरा मारावा लागतो.

विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी तसेच रुग्णांना स्थानक गाठताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. काही वेळा प्रवाशांना धोकादायक मार्गांचा वापर करावा लागत असल्याने अपघाताचा धोका निर्माण होत आहे. त्यामुळे प्लॅटफॉर्म क्रमांक २ च्या पूर्वेकडील बाजूस स्वतंत्र प्रवेशमार्ग, वाहन पार्किंग सुविधा, प्रवाशांसाठी शेड, प्रकाश व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच इतर आवश्यक सोयी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. या सुविधा उपलब्ध झाल्यास परिसरातील हजारो नागरिकांना मोठा फायदा होणार असून रेल्वे स्थानकाचा वापर अधिक सोयीस्कर होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

किनवट शहरातील शिवाजी नगर भागात रेल्वेमार्गाखाली बांधण्यात आलेला अंडरब्रिज हा किनवट शहराला स.वि.म. परिसर तसेच अनेक गावांशी जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे.